# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.01.2025** **वारःबुधवार**

---

1. भारतीय हवामान विभाग देशाच्या वैज्ञानिक प्रगतीचं द्योतक आहे; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. दोन युद्धनौका आणि एका पाणबुडीचं पंतप्रधानांच्या हस्ते आज मुंबईत लोकार्पण
3. 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमासाठी विक्रमी नोंदणी
4. महाकुंभमेळ्यात मकरसंक्रांती अमृत स्नानात साडे तीन कोटी भविकांचा सहभाग आणि
5. खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरुष संघांची आगेकूच

**पंतप्रधान**

भारतीय हवामान विभाग हा देशाच्या वैज्ञानिक प्रगतीचं प्रतिक असून, त्यामुळे नगरिकांचं जीवन सुलभ झालं आहे असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल काढले. भारतीय हवामान विभागाच्या दीडशेव्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. हवामानाचा वेध घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली, रडार आणि उपग्रह तसंच उच्च दर्जाच्यासंगणक प्रणालीचा समावेश असलेल्या 'मिशन मौसम' या उपक्रमाचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झालं. मिशन मौसम या उपक्रमातून शाश्वत आणि भविष्यवेधी भारत घडवण्याचा संकल्प अधोरेखित होत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. हवामानशास्त्र विभागाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त एका विशेष नाण्याचं अनावरणही त्यांनी केलं. हवामान अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामानबदलाचे दुष्परिणाम कमी करणं यासंबधीचं धोरण असलेल्या IMD विजन-2047 चं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं.

**पंतप्रधान-मोदी-मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांच्या उपस्थितीत आज मुंबईत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या दोन युद्धनौका, आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार आहे. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी एकाचवेळी नौदलाच्या ताफ्यात सहभागी होणार आहेत. नौदलाच्या माझगाव गोदीमध्ये या युद्धनौका आणि पाणबुडीची बांधणी करण्यात आली आहे. आपल्या मुंबई दौऱ्यात पंतप्रधान नवी मुंबईतील इस्कॉनच्या श्रीश्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही करणार आहेत.

**लष्करप्रमुख**

सैन्य दलांतील माजी सैनिक आणि त्यांच्या परिवाराचा देशाला अभिमान असून ते देशासाठी प्रेरणास्रोत आहेत, असं प्रतिपादन लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल पुण्यात केलं. नवव्या सशस्त्र माजी सैनिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 28 हजार माजी सैनिकांना रोजगार मिळावा यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात आलं आल्याचं जनरल द्विवेदी म्हणाले. यावेळी वीर पत्नी, आणि वीर सैनिकांच्या पालकांचा द्विवेदी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसंच सन्मान या नियतकालिकाचं प्रकाशनही करण्यात आलं.

**पंतप्रधान-सेना दिन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सशस्त्र सेना माजी सैनिक दिनानिमित्त काल माजी सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पंतप्रधानांनी माजी सैनिकांना श्रद्धांजली वाहिली आणि त्यांच्या बलिदानाची, धैर्याची आणि देशाच्या रक्षणासाठीच्या अढळ निष्ठेची प्रशंसा केली.

**राजनाथसिंह-माजी सैनिक मेळावा**

पाकव्याप्त काश्मीरशिवाय जम्मू-काश्मीर अपूर्ण आहे, असं प्रतिपादन केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल केलं. जम्मू-काश्मीर मधील अखनूर इथे आयोजित करण्यात आलेल्या माजी सैनिक मेळाव्याला ते संबोधित करत होते. पाकव्याप्त काश्मीर भागातील भूमी पाकिस्तान दहशतवादी कारवायांसाठी वापरते, इथे दहशतवाद्यांसाठी प्रशिक्षण शिबिरं चालवली जातात, या सगळ्या परिस्थितीची सरकारला चांगलीच  जाणीव असून योग्य वेळी योग्य कारवाई करण्यात येईल असं ते पुढे म्हणाले. लष्करातील जवानांच्या कुटुंबियांप्रती सरकारच्या असलेल्या वचनबद्धतेचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

**सैनिक-गडकरी**

संरक्षण दलात सैनिकांनी केलेलं सेवाकार्य आपण कधीच विसरू शकत नाही; त्यांच्यामुळेच या देशाचा गौरवशाली इतिहास, परंपरा आणि आपणही सुरक्षित असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते काल नागपूर इथं सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

**लष्करदिन**

77व्या लष्कर दिनाचं मुख्य संचलन आज पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर होत आहे. या संचलन सोहळ्याला लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत. लष्कर दिनानिमित्त संध्याकाळी होणाऱ्या गौरव गाथा या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह  यांची प्रमुख उपस्थिती असेल. लष्कर दिनानिमित्त होणारं संचलन पहिल्यांदाच पुण्यात होत असून यामध्ये लष्कर, पोलीस दल आणि महाराष्ट्र एनसीसीचं महिला पथक सहभागी होणार आहे. प्रथमच नेपाळचा लष्करी वाद्यवृंदही या कार्यक्रमात सहभागी होणार आहे.

**सिंगापूर-राष्ट्राध्यक्ष**

सिंगपूरचे राष्ट्राध्यक्ष थारमान षण्मुगरत्नम यांचं काल पांच दिवसांच्या भारतभेटीवर आगमन झालं. केंद्रीय वाणिज्यराज्य मंत्री जितीन प्रसाद यांनी त्यांचं स्वागत केलं. दौऱ्यादरम्यान, ते राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्रव्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशांकर यांची भेट घेणार आहेत. थरमन यांच्या भेटीमुळे उभय देशांमधील मैत्री, विश्वास आणि परस्पर सहकारी अधिक वृद्धिंगत होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**द. आफ्रिका-खाण दुर्घटना**

दक्षिण आफ्रिकेतल्या नॉर्थ-वेस्ट परगण्यातील एका सोन्याच्या खाणीत खाणकाम करणाऱ्या 100 जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या नोव्हेंबर पासून खाणीत खोलवर अडकलेल्या मजुरांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य हाती घेण्यात आलं होतं. हे सर्व जण बेकायदेशीरपणे खाणकाम करण्यासाठी उतरले होते.

**परीक्षा पे चर्चा विक्रम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी यावेळी विक्रमी सव्वा तीन कोटी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी नोंदणी केली आहे. यात परदेशी विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. या कार्यक्रमाची आठवी आवृत्ती शालेय स्तरावर 12  जानेवारीपासून सुरू झाली असून, ती 23 जानेवारी रोजी संपेल. पंतप्रधान मोदींच्या 'परीक्षा पे चर्चा' या अनोख्या उपक्रमाचा उद्देश परीक्षेशी संबंधित ताण कमी करणे हा आहे. या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतात आणि आत्मविश्वासाने आणि सकारात्मक मानसिकतेने परीक्षा देण्यासाठी उपयुक्त सूचना देतात.

**महाकुंभ**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथे सुरू असलेल्या महाकुंभमेळयात काल मकरसंक्रांतीच्या दिवशी त्रिवेणी संगमावर सुमारे साडेतीन कोटी भाविकांनी पवित्र स्नान केलं. या महाकुंभ मेळयात भाविकांना भाषेचा अडसर होऊ नये म्हणून ईलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने 'भाषिणी'मंच उपलब्ध करून दिला आहे. यात अकरा भाषा समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

**हळद**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल नवी दिल्ली इथं दूरस्थ पद्धतीनं राष्ट्रीय हळद मंडळाचे उद्घाटन केलं. हे मंडळ महाराष्ट्रासह 20 राज्यांमधील हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या कल्याणासह हळदीच्या अधिक चांगल्या जातींचा विकास आणि निर्यातीवर लक्ष केंद्रीत करेल, असं गोयल यांनी सांगितलं. जगातील एकूण हळद उत्पादनापैकी 70 टक्के हळद भारतात उत्पादित होते, असंही त्यांनी नमूद केलं. राष्ट्रीय हळद बोर्डाच्या स्थापनेचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. या बोर्डाच्या माध्यमातून निर्यात, नवोन्मेष आणि संशोधनाला चालना मिळेल आणि त्याचा, शेतकरी आणि ग्राहक या दोन्ही घटकांना फायदा होईल असा विश्वास त्यांनी समाज मध्यमांवरील संदेशात व्यक्त केला आहे.

**लेह- अपघात**

लडाखमध्ये, कारगिलमधील राष्ट्रीय महामार्ग एकवर कटपाकासी शिलिकचे इथं काल एका स्कॉर्पिओची ट्रिपरशी टक्कर होऊन झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये तीन स्थानिक रहिवाशांचा समावेश आहे. जखमींवर कारगिल जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**खोखो**

खो खो विश्वचषक स्पर्धेत भारताच्या दोन्ही संघांनी काल चमकदार कामगिरी करत विजयाची नोंद केली. प्रियांका इंगळे हिच्या नेतृत्वातील भारतीय महिला संघानं काल सलामीच्या सामन्यात दक्षिण कोरियावर 175-18 असा दणदणीत विजय मिळवला. तर अटी-तटीच्या झालेल्या सामन्यात भारतीय पुरुष संघानंही ब्राझीलवर 64-34 गुणांनी मात केली. भारतीय पुरुष संघाचा कर्णधार प्रतीक वाईकरला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आलं. पबरी साबरला सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू म्हणून गौरवण्यात आलं.

**महिला क्रिकेट**

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघादरम्यानच्या, मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना आज राजकोट इथे खेळला जाणार आहे. भारतीय संघाने या आधीचे दोन्ही सामने जिंकले असून, आजचा सामना जिंकून मालिका जिंकण्याचा भारतीय महिलांचा प्रयत्न असेल.

**हवामान**

पंजाब, हरयाणा, चंदीगढ, दिल्ली आणि उत्तर प्रदेशच्या पश्चिम भागात आज वीजांसह वादळी वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पुढील दोन दिवस उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात पाऊस आणि बर्फवृष्टि होण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली असून, मध्य भारत आणि महाराष्ट्रातील किमान तापमानात 2 ते 3 अंश सेल्सियसने वाढ होण्याचा अंदाज वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.